****गणराज्य** (प्रजासत्ताक)**

लोकशाही आणि गणराज्य प्रजासत्ताक मध्ये काय फरक आहे? दोन्ही शब्दांचा अर्थ तर जवळपास एकच आहे. मग दोन वेगवेगळे शब्द कशाला?

ते आपण समजून घेऊ.

मला सांगा, आपल्या देशाच्या राष्ट्रपती कोण आहेत?

श्रीमती. द्रौपदी मुर्मूजी.

त्यांचे वडील राष्ट्रपती होते का? नाही. मग आई असतील? किंवा आजी? नाही?

मग त्या राष्ट्रपती कशा झाल्या? तर निवडणूकीच्या माध्यमातून!

आपल्या देशाच्या प्रमुखपदी (राष्ट्रपती - सर्वोच्च स्थानी असणारी व्यक्ती) कोण बसणार, हे देखील निवडणूकीच्या माध्यमातूनच ठरते. ते वंशपरंपरेने ठरत नाही.

जसे की, इंग्लंड मध्ये लोकशाही आहे पण तो देश गणराज्य नाही. तिथे देशाचा प्रमुख राजा किंवा राणी असते आणि ते वंशपरंपरेने ठरते.

**आता एक गोष्ट:**

एक शाळा होती आणि त्या शाळेत दोन मित्र शिकत होते. एक दिवस त्यांच्यात भांडण झालं—कोणती मिठाई जास्त चविष्ट आहे: गुलाबजाम की रसगुल्ला? हळूहळू पूर्ण वर्ग आणि मग पूर्ण शाळाच या वादात अडकली. शाळा सुरू होण्यापूर्वी वाद, वर्गात वाद, रिसेसमध्ये वाद, आणि शाळेनंतरही फक्त वादच वाद! सर्व शिक्षक त्रासून गेले—हा झगडा कसा संपवायचा? तुम्ही शिक्षकांना मदत करू शकता का? हा वाद कसा सोडवायचा?

○ इथे मुलांकडून सूचना घ्या—थोड्याच वेळात मुलेच बरोबर उत्तर देतात:

ज्याला गुलाबजाम हवा, त्याला गुलाबजाम द्या; आणि ज्याला रसगुल्ला हवा, त्याला रसगुल्ला! ज्याला जे आवडतं ते त्याने खावं, पण दुसऱ्याच्या आवडीत लुडबुड करू नये. प्रत्येकाच्या पसंतीचा सन्मान व्हायला हवा.

○ प्रश्न: जर 50 पैकी 45 मुलांना गुलाबजाम आवडत असेल, तर काय करायचं?

उत्तर: तरीही तेच—सर्वांना त्यांच्या पसंतीनुसार मिळायला हवं. शाळेत गुलाबजाम आणि रसगुल्ला—दोन्ही आणायला हवेत. तेव्हाच सर्वांचा सन्मान होईल.

○ याचा थेट अर्थ असा की कितीही बहुमताचं सरकार आलं, तरी त्याला शासन **संविधानानुसारच** चालवावं लागेल.